प्रकरण पाचवे

# उपसंहार

पान क्र. १२० ते १३१

# प्रकरण – पाचवे

## उपसंहार

म. द. हातकणंगलेकर हे समीक्षा प्रवाहातील ज्येष्ठ व श्रेष्ठ समीक्षक म्हणून सर्वाधिक सुपरिचित आहेत. म. द. हातकणंगलेकर हे ज्येष्ठ समीक्षक म्हणून सर्वांना सुपरिचित असले तरी, त्यांचे ललित साहित्यिक म्हणून ही कार्य उल्लेखनिय आहे. अशा या उल्लेखनिय कार्याचा अभ्यास त्यांनी निर्माण केलेल्या, समीक्षात्मक, ललित ग्रंथावरून त्यांच्या अनमोल साहित्य सेवेच्या कार्याची महती पटते.

म. द. हातकणंगलेकरांनी नियतीच्या कालचक्रामुळे असेल किंवा साहित्य प्रवाहातील राजकारणामुळे असेल, ज्या सहित्यिकांचे साहित्य अप्रकाशित राहिलेले होते, अशा साहित्यिकांचे साहित्य प्रकाशित करण्याचे अनमोल कार्य केलेले आहे. याबरोबरच म. द. हातकणंगलेकरांनी काही पुस्तकांच्या संपादनाचे कार्य ही केलेले आहे. काही पुस्तकांचे त्यांनी भाषांतरही केलेले आहे. साहित्याशी निगडीत मासिकांना जन्म देऊन नदीच्या प्रवाहासारखे त्यांना प्रवाहित केलेले आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या विषयावर म. द. हातकणंगलेकरांचे लेख प्रकाशित आहेत. मराठी साहित्याचे इंग्रजीमध्ये व इंग्रजी साहित्याचे मराठीमध्ये अनेक पुस्तकांची भाषांतरीत लेखन म. द. हातकणंगलेकरांनी केलेले आहे. याबरोबर म. द. हातकणंगलेकरांनी ललित ग्रंथलेखनाची निर्मितीही केलेली आहे. जसे मराठी साहित्यामध्ये त्यांनी समीक्षा लेखन केले आहे, त्याचप्रमाणे इंग्रजीमध्ये लिहिलेल्या काही पुस्तकांचेही त्यांनी समीक्षालेखन केलेले आहे. असे व यासारखे साहित्याच्या प्रवाहामध्ये म. द. हातकणंगलेकरांनी दिलेले योगदान उल्लेखनिय आहे.

म. द. हातकणंगलेकर हे एक 'ज्येष्ठ समीक्षक' म्हणून सर्वांना सुपरिचित आहेतच. मात्र एक ज्येष्ठ समीक्षक असतांना एका ललित लेखकास लाजवेल अशी 'ललित' साहित्यकृती निर्माण करून एक 'ललित लेखन' म्हणूनही म. द. हातकणंगलेकर आपले वर्चस्व स्वयंसिद्ध केले आहे. अशा ललित साहित्यकृतीमुळे वाङ्मय प्रकारामध्ये एका नव्या वाङ्मय प्रकाराची मुहूर्तमेढ रोवली असे म्हणले तर ती अतिशयोक्ती ठरेल असे वाटत नाही. म. द. हातकणंगलेकरांसारख्या ज्येष्ठ समीक्षकांचा ललित लेखानाचा ग्रंथ म्हणजे 'उघडझाप' हा होय. म. द. हातकणंगलेकरांच्या

'उघडझाप' मधील आठवणी संग्रहाच्या ललित ग्रंथाचा सर्वांगीण अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये केलेला आहे. म. द. हातकणंगलेकरांच्या ललित आठवणी संग्रहाचा अभ्यास करण्याच्या प्रयोजनाचा मुख्य उद्देश हा की, 'एक समीक्षक ज्या तटस्थ वृत्तीने इतर साहित्यकृतीकडे पाहात असतो. त्याच तटस्थ वृत्तीने आपल्या जीवनाकडे पाहातो, की आपली जीवनगाथा वाचकासमोर मांडत असताना ती कोठे 'पाझरती होते काय? असा विचार मनामध्ये सातत्याने घोंगावत होता. हाच मुख्य उद्देश म. द. हातकणंगलेकर या ज्येष्ठ समीक्षकांच्या 'उघडझाप'या ग्रंथाचा अभ्यास करण्यामागे होता, तसा प्रयत्न या लघुप्रबंधामध्ये केलेला आहे.

'उघडझाप' या ललित ग्रंथाचा अभ्यास करण्यासाठी त्याची विस्तृत मांडणी केलेली आहे. या ग्रंथाची विस्तृत मांडणी चार प्रकरणामध्ये केलेली आहे. यापूर्वीच्या चार प्रकरणाची मांडणी केल्यानंतर प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये या लघुप्रबंधातील चारही प्रकरणांचा 'सारांश' उपसंहारामध्ये मांडण्याचे प्रयोजन आहे.

म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या आठवणींच्या संग्रहाचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर या ललित ग्रंथाचे लालित्य, या ग्रंथामधील वैचारिक बैठक, त्यातील सौंदर्य, निसर्गाविषयीची व्यक्तिविषयीची असणारी म. द. हातकणंगलेकरांना जवळीक व जाणीव माणसाविषयीची असणारी तळमळ या व यासारख्या अनेक गोष्टी 'उघडझाप' याग्रंथामधून वाचकास प्रत्ययाला येतात.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात मराठी साहित्य प्रवाहातील 'चरित्र-आत्मचरित्र', 'आत्मकथन', व 'आठवणी संग्रह'या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप कशा पद्धतीचे असते हे सांगितलेले आहे. असे स्वरूप विशद करीत असताना त्याच्या उगमापासून ते आजपर्यंत त्याचा झालेला 'विकास' व त्याची 'वाटचाल' येथे ठळकपणे नमूद केलेली आहे. या पहिल्या प्रकरणाच्या प्रस्तावनेमध्ये 'चरित्र-आत्मचरित्र' व 'आत्मकथन' या साहित्य प्रकाराची थोडक्यात माहिती देऊन, त्या कलाकृतीच्या लेखनामागील मुख्य उद्देश, प्रेरणा व त्याच्या निर्मिती मागील कारणे मांडलेली आहेत. अशा साहित्यकृतीमधून वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिबरोबर, सर्वसामान्य माणसांच्या जीवनातही लेखनाचे जिवंत झरे सापडू शकतात. हा विचार या कलाकृतीचा अभ्यास करताना मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रास्ताविकानंतर याच प्रकरणामध्ये 'चरित्र-आत्मचरित्र' व 'आत्मकथा' या लेखन प्रकाराची पूर्वपरंपरा व त्याचे स्वरूप यांचा परामर्श घेतलेला आहे. प्रारंभीच्या कालखंडामध्ये चरित्र या वाङ्मय प्रकाराचे लेखन विपूल प्रमाणात असून, प्राचीन काळापासून या वाङ्मय प्रकाराचे जे लेखन झालेले आहे त्याचे काही दाखले नमूने म्हणून दिलेले आहेत. या चरित्र लेखनामध्ये म्हाइंभट लिखित, 'लिळाचरित्र' असून जनार्दन ओक कृत 'अहिल्याबाई होळकरांच्या' चरित्रापर्यंतचा गोषवारा दिला आहे. चरित्र वाङ्मय या प्रकारच्या लेखन स्वरूपामध्ये काळानुरूप कसा बदल होत गेला या ही गोष्टीचा संदर्भ यामध्ये दिलेला आहे. या बदलामध्ये सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी घटकांचा परिणाम चरित्र वाङ्मय प्रकारावरती कसा जाणवतो. या गोष्टीचा परामर्श याठिकाणी घेतलेला आहे. या परिणामासोबत वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तिंची जी उल्लेखनिय अशी चरित्र लिहिली गेली त्यांचा ओझरता उल्लेख या ठिकाणी केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या पुढील भागात 'आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकाराची वाटचाल व त्याचे स्वरूप कसे होते. व त्यामध्ये काळानुरूप कसा बदल होत गेला या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. 'चरित्र' या वाङ्मय प्रकारापेक्षा 'आत्मचरित्र' हा वाङ्मय प्रकार कोणत्या गुणधर्मामुळे वेगळा ठरतो या गोष्टीचा परामर्श घेतलेला आहे. या फरकांसदर्भात असणारा परामर्श घेत असताना 'रा.ग.जाधव', 'डॉ. सदा कऱ्हाडे,' अशा विचारवंतांचे आत्मचरित्राविषयी असणारी मते जाणून घेतलेली आहेत. 'आत्मचरित्र' हा वाङ्मय प्रकार इंग्रजी आमदनीमध्ये खऱ्या अर्थाने सुरू झालेला असला तरी त्याची पाळेमुळे ही प्राचीन कालखंडामध्ये रोवली गेलेली आहेत. तेव्हापासून ते आजअखेर ज्या उल्लेखनिय अशा आत्मचरित्रांचे लेखन झाले त्या आत्मचरित्रांचा ठळकपणे याठिकाणी उल्लेख केलेला आहे. यामध्ये संत जनाबाई, संत नामदेव, संत तुकाराम, संत बहिणाबाई यांच्या त्रोटकपणे लिहिलेल्या आत्मचरित्रांचा उल्लेख देत देत खुनाचा आरोप असणाऱ्या कैद्यांनी जी आपली आत्मचरित्रे लिहिलेली आहेत, येथपर्यंतच्या या आत्मचरित्रांचा त्रोटकपणे गोषवारा दिलेला आहे. जसे पुरूष लेखकांनी आपली जीवनकहाणी समाजासमोर मांडलेली आहे, त्याचप्रमाणे काही 'स्त्री' लेखिकांनीही आपली जीवनकहाणी आत्मचरित्राच्या माध्यमातून समाजासमोर मांडलेली आहेत. त्यांचाही

ओझरतेपणे उल्लेख केलेला आहे. हा उल्लेख करीत असताना त्या लेखनामागील लेखनाची प्रेरणा व उद्देश ही नमूद केलेला आहे.

या प्रकरणाच्या पुढील भागामध्ये 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारांचा आढावा घेतलेला आहे. 'चरित्र-आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकारासारखी 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारास प्राचीन परंपरा नसताना अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करून त्याचाथोडक्यात गोषवारा या प्रकरणामध्ये मांडलेला आहे. हा अभ्यास करीत असताना 'चंद्रकुमार नलगे', 'रा. ग. जाधव' यासारख्या अभ्यासकांच्या मतांचा परामर्श प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेला आहे. हा अभ्यास करीत असताना 'चरित्र-आत्मचरित्र' या वाङ्मय प्रकारापेक्षा 'आत्मकथने' या वाङ्मय प्रकाराच्या लेखनातील वेगळेपण प्रकर्षाने या प्रकरणाच्या माध्यमातून उभे केलेले आहे. १९६० नंतर 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकाराची सुरूवात झालेली असली तरी त्याची पाळेमुळे ही दलित संतांच्या लेखनामध्ये आढळतात. या संदर्भापासून २००३ साली प्रकाशित झालेल्या 'आयदान' या उर्मिला पवारांच्या आत्मकथनापर्यंतच्या आत्मकथनांचा ठळकपणे उल्लेख केलेला आहे.अशा आत्मकथनांच्या लेखनामध्ये आत्मकथनांचा लेखकांनी मग तो पुरूष लेखक असो अथवा स्त्री लेखक असो त्या प्रत्येकांनी आपल्या जीवनाची शोकांतिका, समाजाने केलेल्या आपल्यावरती अन्याय व आपण ज्या जातीत जन्माला आलो त्या जातीचे, दारिद्र्याचे वास्तव चित्रण आपल्या आत्मकथनामधून कशा रीतीने मांडलेले आहे या गोष्टीचा अभ्यास या प्रकरणामध्ये मांडलेला आहे.

यानंतरच्या भागात 'चरित्र-आत्मचरित्र' व 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारापेक्षा आठवणी संग्रहाचे स्वरूप कसे वेगळे आहे याचा या प्रकरणाच्या शेवटी ओझरतेपणी उल्लेख केलेला आहे. हा उल्लेख म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या ग्रंथाच्या संदर्भामध्ये दिलेला आहे. या आठवणींच्या संग्रहामध्ये त्या वाङ्मय प्रकाराचा लेखक 'मी' हा अनेक व्यक्तिरेखेमध्ये कसा गुंतलेला असतो याचाही ओझरतेपणी उल्लेख केलेला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधिकेच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये म. द. हातकणंगलेकर एक व्यक्ती म्हणून त्यांच्या ७५ वर्षांच्या प्रदीर्घ जीवनाचा प्रवास व या प्रदीर्घ जीवनाच्या प्रवासामध्ये त्यांच्या हातून घडलेल्या साहित्य सेवेची माहिती थोडक्यात दिलेली आहे. तर याच प्रकरणाच्या

दुसऱ्या भागामध्ये 'उघडझाप' या म. द. हातकणंगलेकरांच्या आठवणी संग्रहाची प्रयोगशीलता तपासून पाहिलेली आहे.

म. द. हातकणंगलेकर यांचा व्यक्तिपरिचय देत असताना त्यांच्या जन्मापासून ते सांगली येथे भरलेल्या '८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' अध्यक्षपद भुषवण्यापर्यंतचा जीवनाचा गोषवारा थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न या प्रकरणामध्ये केलेला आहे. त्यांच्या या जीवनाच्या प्रवासामध्ये त्यांनी प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षण कोणत्या परिस्थितीमध्ये पूर्ण केले. शिक्षण घेत असताना आलेल्या अनंत अडचणी. अशा अडचणीवरती मात करून शिक्षण पूर्ण करण्याची त्यांची जिद्द या प्रकरणामध्ये नमूद केलेली आहे. शिक्षण घेत असतांना मिळालेल्या वेगवेगळ्या शिष्यवृत्त्यां, या सर्वांनी त्यांच्या जीवनाला कलाटणी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कसे केलेले आहे. याचाही आढावा दिलेला आहे. आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना नोकरीसाठी करावी लागणारी धडपड, अशा धडपडीतून विलिंग्डन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कसे स्थिरावले याही गोष्टीचा अभ्यास या घटकामध्ये केलेला आहे.

म. द हातकणंगलेकर यांचे बालपण जसे खेड्यामध्ये व्यतीत झाले आहे, तसे त्यांचे तरूणपण शहरीभागामध्ये व्यतीत झालेले आहे. एका व्यक्तिच्या मनावरती त्या त्या भौगोलिक परिस्थितीचा झालेला परिणाम व या परिणामातून बनलेले त्यांचे व्यक्तिमत्व कसे घडत गेले या ही गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. या संस्कारक्षम व्यक्तिमध्ये जो एक साहित्यिक लपलेला होता तो त्यांच्या ज्या ज्या कलाकृतीमधून अविरतपणे साकारलेला आहे. त्या साहित्य कलाकृतींचाही या भागामध्ये अभ्यास केलेला आहे. या त्यांच्या कार्याची दखल म्हणून त्यांना मिळालेले पुरस्कार आहेत. त्या पुरस्कारांचाही उल्लेख प्रस्तुत प्रकरणाच्या शेवटी दिलेला आहे, असे पुरस्कार म्हणजे त्यांच्या हातून घडलेल्या साहित्याची व समाजाची जी अविरतपणे चाललेली सेवा आहे. त्या सेवेची ती पोहोचपावतीच म्हणावी लागेल. त्यांना मिळालेल्या पुरस्कारामध्ये १९७६ चा 'आदर्श प्राध्यापक पुरस्कार', 'ग्रंथ पुरस्कार', १९७५ व १९८६ या दोन्हीवेळी झालेला त्यांचा 'नागरी सत्कार' तसेच त्यांना मिळालेला अनेक बहुमानाचा महामेरू म्हणून ज्याचा उल्लेख करता येईल असे २००७ सालचे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद' या व यासारख्या ज्या ज्या अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव केलेला आहे, त्यांचीही

नोंद या प्रकरणात घेतलेली आहे. याच प्रकरणाच्या दुसऱ्या भागामध्ये म. द. हातकणंगलेकरांच्या हातून जी अविरतपणे 'साहित्यसेवा' घडलेली आहे, त्या साहित्यकृतींचा थोडक्यात परिचय याच प्रकरणाच्या दुसऱ्या भागात केलेला आहे. म. द. हातकणंगलेकर यांनी मोजकेच पण लक्षणीय असे लक्षवेधक लिखाण केलेले आहे. त्या साहित्यकलाकृतीचा अभ्यास करून त्याविषयीची मते या प्रकरणामध्ये नोंदवलेली आहेत. त्यांच्या या साहित्यकलाकृतीचा परिचय वाचकांना करून देत असताना साहित्यकृतीमध्ये लपलेल्या एका मर्मग्राही आस्वादक समीक्षाचे दर्शनही घडवलेले आहे. म. द. हातकणंगलेकरांचा या वाङ्मयकलाकृतीमध्ये 'विचाराधारा', 'साहित्यातील अधोरेखिते', 'मराठी कथा : स्वरूप आणि परिसर,' 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप', 'डोहकाळिमा', 'साहित्यसोबती', 'ललित शिफारस', 'वाङ्मयीन शैली आणि तंत्र', 'साहित्यविवेक', 'जी.एं.ची निवडक पत्रे-खंड १ ते ४' अशा मोजक्याच मात्र मौलिक ठरलेल्या पुस्तकांचा अभ्यास करून त्याविषयी मते मांडलेली आहेत. अशा साहित्यकलाकृती मधून म. द. हातकणंगलेकरांच्या साहित्यसेवेची महती व त्यांच्या साहित्याचा व्यासंग दिसून येतो.

उपरोक्त प्रकरणाच्या दुसऱ्या भागात म. द. हातकणंगलेकर एक 'ललित लेखक' म्हणून ज्या ग्रंथाने सुपरिचित आहेत त्या 'उघडझाप' या ग्रंथाची प्रयोगशीलता तपासून पाहिलेली आहे. या ग्रंथाच्या प्रयोगशीलतेच्या प्रस्तावनेमध्ये हातकणंगलेकरांच्या ८१ वर्षाच्या प्रदीर्घ जीवन कालखंडाचा उलघडा करण्यापूर्वी 'चरित्र-आत्मचरित्र' व 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारापेक्षा 'आठवणींचा संग्रह' या वाङ्मय प्रकारामध्ये असलेले लिखानातील भिन्नत्व प्रस्तावनेमध्ये स्पष्ट केलेले आहे. यानंतर 'उघडझाप' या आठवणी संग्रहाचे वेगळेपण कसे आहे? ते स्पष्ट केलेले आहे. असे आठवणी संग्रहाचे लेखन करीत असताना 'चरित्र-आत्मचरित्र' व 'आत्मकथन' या वाङ्मय प्रकारासारखी बंधने या वाङ्मय प्रकारास नसतात. म्हणजेच या वाङ्मय प्रकारामध्ये लिहिले जाणारे लेखन बंधन विरहित असते याचे प्रत्यंतर 'उघडझाप' ग्रंथांच्या आधारे मांडलेले आहे.

'उघडझाप' हा ललित ग्रंथ म. द. हातकणंगलेकरांच्या जीवनामध्ये आलेल्या अनेक व्यक्तिंच्या आठवणींचा संग्रह आहे. अशा आठवणी आप्त, स्नेही, साहित्यिक, मित्र, कुटुंबिय, गुरूजन, यांच्या विषयीच्या आहेत. या सर्व व्यक्तिंचा म.द. हातकणंकलेकरांच्या जीवनाशी

घनिष्ट संबंध आहे. या सर्व व्यक्तिरेखेतून म. द. हातकणंगलेकरांची मूर्ती कशी फिरत राहते, हे मांडलेले . आहे. या आठवणीमध्ये आपल्या बालपणापासून ते आपल्या ७५ वी निमित्त करण्यात आलेल्या 'नागरी सत्कारापर्यंतची' माहिती दिलेली आहे. आपल्या जीवनाची माहिती देत असताना त्या माहितीमध्ये एकसलगता दिसून येत नाही, तर डोळ्यासमोर जीवनामध्ये घडलेल्या गोष्टी जशा आठवतील त्या त्या वेळेस म.द. हातकणंगलेकरांनी वेगवेगळ्या लेखांच्या स्वरूपात प्रकाशीत केलेल्या आहेत. असेच लेख एकत्रित करून 'उघडझाप' या ग्रंथाची निर्मिती झालेली आहे. त्याच ग्रंथाचा थोडक्यात परिचय या दुसऱ्या भागामध्ये केलेला आहे. 'उघडझाप' याचाच अर्थ डोळ्यांची उघडझाप करीत असताना ज्या ज्या गोष्टी डोळ्यासमोर उभ्या राहतात, आठवतात त्याच क्रमाने त्या साकारणे हेच या वाङ्मय प्रकाराचे वेगळेपण 'उघडझाप' या ग्रंथाद्वारे साध्य झालेले आहे का? त्याचा अभ्यास प्रयोगशीलता या घटकामध्ये केलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या ग्रंथाच्या आधारे त्यांच्या ७५ वर्षाच्या प्रदीर्घ जीवनामध्ये आलेल्या व्यक्तिंची व्यक्तिमत्वे, त्यांच्या स्वभावातील गुणदोष, नातेसंबंधीच्या भावना, त्यांचे साहित्यप्रेम व माणूस म्हणून त्यांच्या स्वभावाचे पैलू या व यासारख्या अनेक गोष्टींचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. या वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्तिरेखेतून म. द. हातकणंगलेकरांनी स्वत:चे बालपण, तरूणपण, आपले शिक्षक, नोकरी, जीवनामध्ये करावा लागणारा संघर्ष, सुख-दु:खे या गोष्टी निरागस मनाने व्यक्त केलेल्या आहेत. म. द. हातकणंगलेकरांच्या मनामध्ये आपल्या जीवनातील भूतकाळाविषयीच्या आठवणी हळव्या व नाजूक शब्दांच्या वलयात गुंफलेल्या आहेत. हेच नाजूक शब्दांच्या वलयात गुंफलेले कथन, कथनाच्या भोवती निर्माण केलेली वातावरण निर्मिती, निसर्गचित्रण, प्रसंगवर्णन, विनोद, ग्रामीण-इंग्रजी शब्दांची प्रसंगानुरूप गुंफण, या सर्व गोष्टींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेला आहे. या सर्वगोष्टी वाचत असताना कथनाच्या माध्यमातून वाचकास येणारी प्रचिती म.द हातकणंगलेकरांच्या व्यक्तिजीवनापर्यंत घेऊन जाते. त्यामुळे म. द. हातकणंगलेकरांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा वाचकाच्या मनाला ललित साहित्यकृतीचा आस्वात देऊन जातात. या घटकांचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे.

म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या ग्रंथामध्ये एकूण वीस लेखांचा संग्रह

केलेला आहे. या वीस लेखांपैकी काही लेख प्रकाशित तर काही लेख अप्रकाशित आहेत. प्रकाशित असलेले लेख यापूर्वीच वेगवेगळ्या अंकाच्या माध्यमातून वाचकापर्यंत पोहोचलेले होते. म. द. हातकणंगलेकरंच्या आठवणी संग्रहामधून त्यांचे बालपण, बालपणास असणारा मृद्‌गंध, आजी-आत्या यांच्या हातचा स्वयंपाक-वडिलांच्या मायेपासून पोरके बनलेले बालपण, शिक्षण घेत असताना विद्यार्थीमित्रांचा व शिक्षकांचा लाभलेला सहवास. मामांच्या आधाराने आपणास आपले शिक्षण कसे पूर्ण करता आले या सर्व गोष्टींचा लेखाजोखा या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकरांनी कसा मांडलेला आहे. त्याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे.

म. द. हातकणंलेगकरांचे भावविश्व, त्यांच्या जीवनामध्ये त्यांना भेटलेली जीवाभावाची माणसं, शाळा, मित्र,मैत्रीण, निसर्ग, शेतमळा, जीवनामध्ये उद्‌भवलेले बरे-वाईट प्रसंग यासारख्या गोष्टींचा बारकाईने अभ्यास याप्रकरणामध्ये केलेला आहे. या व यासारख्या अनेक प्रसंगाच्या माध्यमातून मुलगा, मित्र, प्राध्यापक, साहित्यिक, समीक्षक, याबरोबर सामाजिक बांधीलकी, रीतिरीवाज, संस्कृती यांचे जतन करता करता आपली नैतिक जबाबदारीचे योग्यरित्या पालन करणारे म. द. हातकणंगलेकर यांच्या लौकिक जीवनाच्या इतिहासाचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. समाजामध्ये घडणाऱ्या चांगल्या-वाईट गोष्टींचे यथायोग्य आकलन करून, वास्तवतेला धरून सत्याचा स्विकार करून हातकणंगलेकरांनी या व्यक्तिरेखांचे रेखाटन केलेले आहे. या व्यक्तिरेखांच्या जीवनासोबत येणारी माणसे, तेथिल परिसर, त्यांचे जीवनमान, सवयी, काही व्यक्तिंनी जोपासलेले चारित्र तर काहिंचा व्यभिचारीपणा यासारख्या अनेक गोष्टींची गुंफण वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून योग्यपणे कशी पूर्णत्वास नेलेली आहे याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. याच गोष्टीमुळे 'उघडझाप' या ग्रंथास जिवंतपणा व रसरसीतपणा आलेला दिसतो.

आई-वडिलांच्या, आजी-आत्या, मामा यांच्या असणाऱ्या अपेक्षा तसेच मित्रमंडळी शिक्षकाविषयी असणारा भाव, त्यांचे स्वत:चे विश्व या गोष्टी येथे साकार होताना दिसतात. हे म.द. हातकणंगलेकरांचे जीवन वाचकास लालित्याचा गोडवा देत जाते. यामुळे 'उघडझाप' या ग्रंथाच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकरांनी आपण एक श्रेष्ठ 'ललित लेखक' आहोत हे सिद्ध

केलेले आहे. एका समीक्षकाच्या लालित्यपूर्ण कलाकृतीचे दर्शन म्हणजे 'जादूगाराने जशी जादूमय कांडी फिरवून साऱ्यांना वश करून घ्यावे' तोच प्रत्यय म.द. हातकणंगलकरांच्या 'उघडझाप' या ललित ग्रंथाच्या वाचनावेळेस वाचकास येतो.

उपरोक्त लघुप्रबंधिकेच्या चौथ्या प्रकरणामध्ये म. द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या ग्रंथातील लेखनाची निवेदन पद्धती, भाषाशैली, विनोद, अलंकार या गोष्टीचा अभ्यास करून त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये शोधलेली आहेत. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावनेमध्ये भाषा व निवेदनशैली यांचा सहसंबंध सांगितलेला आहे. उघडझाप या ग्रंथाच्या लेखनासाठी म.द. हातकणंगलेकरांनी वापरलेली प्रथमपुरूषी निवेदन पद्धती व त्याचा केलेला प्रसंगानुरूप योग्य वापर, प्रसंगानुसार वापरण्यात आलेली भाषा व दृश्यमयरित्या साकारलेले प्रसंग या प्रसंगासाठी वापरण्यासाठी आलेली भाषारचना या साऱ्या घटकांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेला आहे.

संवादाची भाषा जशी महत्त्वाची असते त्याचप्रमाणे निवेदनाच्या भाषेलाही तितकेच महत्त्व असते. या निवेदनाच्या माध्यमातून म.द. हातकणंगलेकरांनी 'उघडझाप' या ग्रंथातील कथनास रंगतदारपणा व विषयासंबंधीची योग्य मांडणी साधलेली आहे. म. द. हातकणंगलेकर यांनी आपल्या ग्रंथाची केलेली कुशलतेने मांडणी या ग्रंथाचे वेगळेपण आहे. 'उघडझाप' या आठवणींच्या संग्रहामधील व्यक्तिंच्या जीवनातील प्रसंग चित्रमय पद्धतीने उभे केलेले आहेत. या ग्रंथातील व्यक्तिचित्रे उभा करीत असताना 'मी' म्हणून प्रत्येक व्यक्तिरेखांच्या मध्यभागी म.द. हातककणंगलेकर उभे राहतात. म्हणूनच लेखक 'मी'मध्ये अनेक 'मी' साकारलेले आहेत. हेच त्याच्या लेखनाचे असणारे वैशिष्ट्य या प्रकरणात मांडलेले आहे.

म.द.हातकणंगलेकरांनी 'उघडझाप' या ग्रंथासाठी निवेदन शैली, भाषाशैली, वातावरण, प्रसंगनिर्मिती, कथनामध्ये येणारे वास्तवतेचे दर्शन, दु:ख-वेदनेतील दाहकता, सुखामधील उल्हासितपणा या साऱ्यांच्या मांडणीमुळे हा ग्रंथ अधिकच रोचक व वाचकांच्या मनाला अतृप्त गोडवा कसा मिळवून देतो याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे.

याबरोबर म. द. हातकणंगलेकरांचे वास्तव्य ज्या-ज्या ठिकाणी झालेले आहे, त्या ठिकाणच्या मातीमध्ये रूजलेले शब्द 'उघडझाप' या ग्रंथामध्ये कसे साकारलेले आहेत याचाही अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. असे मातीतील शब्द म.द. हातकणंगलेकरांच्या रक्तामध्ये

भिनलेले आहेत. ते प्रसंगानुरूप कसे अवतरतात. याची प्रतिची 'उघडझाप' या ग्रंथाद्वारे दिलेली आहे. या शब्दातून व्यक्तिचा स्वभाव व त्यांच्या स्वभावाचे पैलू ग्रामीण शब्दातून कसे साकार केलेले आहे त्याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. त्याबरोबर 'उघडझाप' या पुस्तकामध्ये म्हणी, वाक्प्रचार, संवाद याच्या माध्यमातून भाषेची विशिष्टता लक्षात येते. एकूणच 'उघडझाप' हा ग्रंथ वाचकास आत्मशोध करावयास भाग पडतो. याग्रंथाच्या निवेदनाच्या माध्यमातून अनेक 'मी' म. द. हातकणंगलेकरांच्या व्यक्ती प्रतिबिंबांमध्ये कसे पाहावयास मिळतात. याचाही अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. याच लेखनाच्या आधारे म. द. हातकणंकलेकरांच्या लेखनाचे विशेष सांगितले आहेत. याबरोबर म. द. हातकणंगलेकर यांच्या लेखन शैलीचे त्यांच्या ग्रंथातील प्रसंगाचे, दृश्यांचे व वर्णनतेचे वाङ्मयीन विशेष सांगून उपरोक्त लघुप्रबंधिकेच्या शेवटी निष्कर्ष नोंदविलेला आहे.

★★★★★

# संदर्भ साधने व परिशिष्ट

# संदर्भ साधने


## अ) संदर्भ ग्रंथ

१) जोशी अ. म. : चरित्र वाङ्मय 'प्रदक्षिणा', खंड पहिला, संपादन–अनिरूद्ध कुलकर्णी, काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९४१.

२) फडकुले निर्मलकुमार : 'प्रदक्षिणा', खंड दुसरा, संपादन – अनिरूद्ध कुलकर्णी, काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९१.

३) कुलकर्णी गो. म. व : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड–सहावा, भाग–पहिला, प्रकाशन – राजा फडणीस, प्रथमावृत्ती – १९८८

४) जाधव रा. ग. : 'मराठी विश्वकोष', खंड–दुसरा, संपादन–तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रथमावृत्ती १९७६.

५) हातकणंगलेकर म. द.: 'विचारधारा' प्रकाशक–अनिरूद्ध कुलकर्णी, काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९७९.

६) हातकणंगलेकर म. द.: 'साहित्यसोबती', प्रकाशक–अनिरूद्ध कुलकर्णी, काँटिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८०.

७) हातकणंगलेकर म. द.: 'उघडझाप', मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, प्रथमावृत्ती १९८०.

८) पाध्ये कमल : 'बंध–अनुबंध' मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, जानेवारी २००४

## ब) नियतकालिके

१) करंदीकर वि. रा. : 'ललित' (मासिक) जानेवारी २००८

२) बेलवलकर सुमन : 'ललित' (मासिक) जानेवारी २००८

३) पाध्ये दिगंबर : 'ललित' (मासिक) जानेवारी २००८

४) पवार गो. मा. : 'ललित' (मासिक) जानेवारी २००८

५) पाटील तानाजी : 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' म. द. हातकणंगलेकर विशेषांक ऑक्टोबर-डिसेंबर २००७.

६) नलगे चंद्रकुमार : 'अस्मिता दर्शन', दिवाळी अंक, दलित आत्मकथन विशेषांक, सन १९८३.

७) जाधव रा. ग. : 'अस्मिता दर्शन', दिवाळी अंक, दलित आत्मकथन विशेषांक, सन १९८३.

**क) साप्ताहिक**

१) खराडे बा. द. : संपादक – 'साप्ताहिक साधना', म. द. हातकणंगलेकर विशेषांक, सप्टेंबर २००७.

**ड) दैनिक**

१) सप्रे अविनाश : 'दै. तरूण भारत' दि. ०२ नोव्हेंबर २००७

२) कांबळे उत्तम : 'दै. तरूण भारत' दि. ०२ नोव्हेंबर २००७

३) पवार गो. मा. : 'दै. तरूण भारत' दि. ०२ नोव्हेंबर २००७

४) जाधव रा. ग. : 'दै. तरूण भारत' दि. ०२ नोव्हेंबर २००७

**इ) साधन ग्रंथ**

१) हातकणंगलेकर म. द.: 'उघडझाप', मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, प्रथमावृत्ती १९८०.


**********

# परिशिष्ट

## प्रा. म.द. हातकणंगलेकर – व्यक्तिपरिचय

| | | |
|---|---|---|
| जन्म | : | १ फेब्रुवारी १९२७ रोजी, हातकणंगले, (जि. कोल्हापूर) |
| प्राथमिक शिक्षण | : | कोल्हापूर व सांगली, मॅट्रिक – १९४४ |
| महाविद्यालयीन शिक्षण | : | विलिंग्डन महाविद्यालय, सांगली. |
| | | १९४६ : इंटर आर्टस्, मुंबई विद्यापीठाचे सेल्बी पारितोषिक |
| | | १९४८ : बी.ए., इंग्रजी विषयाचे एलिस पारितोषिक, मुंबई विद्यापीठ, मुंबई. |
| | | १९५० : एम. ए., इंग्रजी. |

**अध्यापक :**

- सन १९५६ ते १९८७ इंग्रजी विषयाचे प्राध्यापक, प्रथम ॲग्रीकल्चर कॉलेज, धारवाड, नंतर निवृत्तीपर्यंत विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.
- १९६२ पासून आजीव सेवक : डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे.
- १९७३ ते १९७८ : प्राचार्य, विलिंग्डन महाविद्यालय.
- १९७६ : महाराष्ट्राचे शासनाचे 'आदर्श प्राध्यापक' हा सन्मान.
- शिवाजी व पुणे विद्यापीठांच्या इंग्रजी अभ्यास मंडळावर वेळोवेळी निवड.
- शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर तज्ज्ञ म्हणून निवड. विविध विद्यापीठातील पीएच.डी. प्रबंधांचे परीक्षक.
- सत्यकथा, समाजप्रबोधन पत्रिका, नवभारत, वसंत, वीणा, Quest, New Quest, Theatre Units Bulletin यांतून आणि साहित्य अकादमीच्या नियमकालिकांतून सातत्याने लेखन.
- मराठी कथांचे इंग्रजीत व इंग्रजी कथांचे मराठीत अनुवाद.
- माचीवरचा बुधा (गो.नी. दांडेकर), सती (व्यंकटेश माडगूळकर) या पुस्तकांचा इंग्रजीत अनुवाद (अप्रकाशित)

**प्रकाशने**

१) 'साहित्यातील अधोरेखिते', सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८०.

२) 'मराठी कथा : रूप आणि परिसर', सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८६.

३) 'साहित्यविवेक', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७.

४) 'साहित्यसोबती', मानसन्मान प्रकाशन, पुणे, ऑगस्ट १९९७.
५) 'भाषणे आणि परीक्षणे', सांगाती पब्लिकेशन्स, बेळगाव, मार्च २००१.
६) 'आठवणीतली माणसं', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, जुले २००५.
७) 'उघडझाप', मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००५
८) 'वि.स. खांडेकर : इंग्रजी चरित्र', साहित्य अकादमी, दिल्ली, १९८६

**संपादने :**

१) विचारधारा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.
२) 'ललित वाङ्मयीन शैली आणि तंत्र', अभिजात प्रकाशन, कोल्हापूर. १९८१.
३) 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप (१९५०-१९७५)', (सहकार्याने, सहकारी : प्रा. गो. मा. पवार) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६.
४) 'डोहकाळिमा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७.
५) 'श्री.दा. पानवलकर', विश्वमोहिनी, पुणे, १९८७.
६) 'श्री. दा. पानवलकर निवडक कथा', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९८८.
७) 'निवडक मराठी समीक्षा' (सहकार्याने, सहकारी-प्रा. गो. मा. पवार), साहित्य अकादमी, नवी दिल्ली, १९९९.
८) 'जीएंची निवडक पत्रे खंड १ ते ४, (सहकार्याने सहकारी : श्री. पु. भागवत, सु. रा. चुनेकर) मौज प्रकाशन गृह, मुंबई.
९) 'निवडक गंभीर आणि गमतीदार', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.
१०) 'निवडक ललित शिफारस', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.

**भाषांतर :**

रामकृष्ण आणि विवेकानंद या डॉ. वि. रा. करंदीकर यांच्या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर

**संस्थांचे सदस्य म्हणून कार्य :**

साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोष निर्मिती मंडळ
साहित्य अकादमी समिती, ज्ञानपीठ मराठी समिती
जनस्थान पुरस्कार समिती, कराड साहित्य पुरस्कार समिती
रा. श्री. जोग पुरस्कार समिती, जी. ए. कुलकर्णी स्मृतिसदन योजना
श्री. दा. पानवलकर स्मृती व्याख्यानमाला
कुलगुरू कै. भा. शं. भणगे स्मृती व्याख्यानमाला

**संस्मरणीय प्रसंग :**

१९७६ : महाराष्ट्र शासनाचा आदर्श प्राध्यापक पुरस्कार

१९९८ : महाराष्ट्र फाऊंडेशन ग्रंथ पुरस्कार

१९८६ : निवृत्तीनिमित्त नागरी सत्कार, हस्ते : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

१९९२ : तौलनिक साहित्याभ्यास या गौरवग्रंथाचे प्रकाशन, हस्ते : भालचंद्र नेमाडे.

१९९६ : अध्यक्ष, ५३ वे औदुंबर साहित्य संमेलन (सदानंद साहित्य मंडळ)

१९९८ : ७१ वा वाढदिवस :
'समाज आणि साहित्यिक' या रंगनाथ पठारे यांच्या निबंधावर चर्चासत्र

२००२ : ७५ वा वाढदिवस : नागरी सत्कार. हस्ते : मधु मंगेश कर्णिक,
अध्यक्ष : प्रा. ग. प्र. प्रधान.

२००२ : अध्यक्ष, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा-संमेलन, सांगली.

२००५ : 'उघडझाप' चे प्रकाशन, हस्ते : मंगेश पाडगावकर.

२००७ : अध्यक्ष : ८१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सांगली.

**निवृत्तीनंतरचे कार्य :**

- उगवाई मासिकाचे संपादन
- परदेश प्रवास : इंग्लंड, शेक्सपीअर जन्मस्थान, व्हॅन गॉग चित्रप्रदर्शन इत्यादींना भेट.
- प्रेमानंद गज्वी यांच्या 'किरवंत' या नाटकाचे सी-गल कलकत्ता या प्रकाशन संस्थेसाठी इंग्रजी अनुवाद व संपादन.
- एनसायक्लोपिडिया ऑफ इंडियन लिटरेचर या केरळ अकादमीतर्फे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात मराठी कादंबरीवर लेखन.

**लेख :**

सत्यकथा, समाजप्रबोधन पत्रिका, नवभारत, वसंत, वीणा, दै. तरूण भारत इ. मराठी नियतकालिकांतून तसेच Quest, New Quest, Theatre Units Bullietin या व साहित्य अकादमीच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या इंग्रजी नियतकालिकांतून लेखन.

**दूरदर्शन : मुलाखती**

- चर्चासत्र - ग्रामीण साहित्य व चारूता सागर
- नरेंद्र जाधव, 'मी आणि आमचा बाप'

********